महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १८३ वे | दिनांक : २८/०६/२०२६ | वार : रविवार

## फडणवीसांना रोखण्यासाठी अमित शाहांचे 'ऑपरेशन देवेंद्र' - उद्धव ठाकरे



**यवतमाळ** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिंगोली येथील जाहीर सभेतून बंडखोर खासदारांवर आणि महायुती सरकारवर शब्दांचे तीव्र बाण सोडले आहेत. "हे 'ऑपरेशन टायगर' नसून, देवेंद्र फडणवीस यांचे पंख कापण्यासाठी अमित शाह यांनी रचलेले 'ऑपरेशन देवेंद्र' आहे," असा खळबळजनक दावा ठाकरेंनी केला. तसेच, "काम संपले की मिंधेंना कचऱ्याच्या टोपलीत फेकले जाईल, हे आजच लिहून ठेवा," अशा अत्यंत तिखट शब्दांत त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय भविष्यावर भाष्य केले.

उद्धव ठाकरे म्हणाले, "फुटलेले खासदार थेट भाजपमध्ये जाण्याऐवजी मिंधेंकडे का गेले? हे एक मोठे कोडे होते. मात्र, यामागचे खरे कारण आता समोर आले आहे. देवेंद्र फडणवीस हे आज ना उद्या दिल्लीत पंतप्रधानपदाच्या शर्यतीत उतरतील, अशी भीती तिथल्या नेत्यांना आहे. म्हणूनच त्यांचे पंख कापण्यासाठी आणि महाराष्ट्रातील कोणताही नेता दिल्लीत पोहोचू नये म्हणून अमित शाह यांनी हे खासदार मिंधेंकडे सरकवले आहेत, जेणेकरून फडणवीस महाराष्ट्राच्याच राजकारणात गुंतून राहतील. उद्या जर पंतप्रधान निवडीचा प्रश्न आला, तर हे लाचार गुलाम अमित शाह यांच्याच बाजूने उभे राहतील. ही पुढची व्यवस्था करण्यासाठीच शिवसेना फोडण्यात आली आहे."

हिंगोलीतील स्थानिक बंडखोर नेत्यांचा समाचार घेताना उद्धव ठाकरे कमालीचे आक्रमक झाले होते. "साहेब १०० टक्के सोबत आहोत, असे सांगून रात्रीतून पैसे घेऊन पसार होणाऱ्या या गद्दारांना जर शिवसेनेने खासदार-आमदार केले नसते, तर यांच्या दाराला कुत्रंही उभं राहिलं नसतं," अशा शब्दांत त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींवर हल्ला चढवला.

"इथल्या गद्दाराने आधी विश्वासघात केला आणि आता पुन्हा स्वतःच्या मुलाला पुढे केले. आम्ही केले तर तिला घराणेशाही म्हणायचे. पण तिकडे स्वतः बाप उपमुख्यमंत्री बनून बसलाय आणि त्याचे कारटे (खासदार श्रीकांत शिंदे) दिल्लीत बसून आमचे खासदार फोडत आहे," असे म्हणत त्यांनी शिंदे पिता-पुत्रांवर कडक शब्दांत टीका केली.

याआधी वाशिम येथील सभेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, "जी लोकं कालपर्यंत माझ्यासोबत होती आणि आज ती फुटली, या लोकांची मला लाज वाटते. माझ्या नावावर आणि माझ्या दौऱ्यांमुळेच हे खासदार निवडून आले होते. या गद्दारांनी चक्क आईची शपथ घेऊन गद्दारी केली आणि गद्दारांच्या कळपात जाऊन सामील झाले. म्हणूनच, या मतदारसंघात येऊन मी माझ्या मतदारांची जाहीर माफी मागण्यासाठी आलो आहे," अशा भावनिक शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांचे वाभाडे काढले. यवतमाळच्या महासभेत बोलताना त्यांनी बंडखोर खासदार संजय देशमुख यांचा एक जुना व्हिडिओही दाखवला.

केंद्रीय यंत्रणा आणि सत्ताधाऱ्यांवर हल्ला चढवताना उद्धव ठाकरे म्हणाले, "यांनी आमचा पक्ष चोरला, चिन्ह चोरले, आमदार-खासदार फोडले तरीही ठाकरे आज ताठ कण्याने मैदानात उभा आहे. आमदार फोडल्यानंतरही शिवसैनिकांनी मेहनत करून या खासदारांना पुन्हा निवडून दिले होते, पण हे विकले गेले. सध्या राज्यात निवडणुका नसतानाही ही फोडाफोडी सुरू आहे. पण मी सांगतो, जोपर्यंत जनतेचे प्रश्न संपत नाहीत, तोपर्यंत कोणीही ठाकरे किंवा शिवसेना संपवू शकणार नाही. जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा याच मतदारसंघातून पुन्हा ठाकरेंचाच खासदार निवडून येईल."

भाजपवर थेट निशाणा साधत उद्धव ठाकरे म्हणाले, "आज देशात राम मंदिराच्या दानपेटीतील पैसे चोरले जात आहेत. हे सरकार केवळ लूट करत आहे. हे खासदार म्हणतात की विकासनिधीसाठी आम्ही गेलो; पण मला सांगा, हा विकासनिधी काय फक्त भाजपच्या मालकीचा आहे का? तो जनतेच्या हक्काचा पैसा आहे." ६ खासदारांच्या बंडानंतर विदर्भातील पहिल्याच सभेत उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांना थेट गाडण्याचा इशारा दिला असून, या सभेला शिवसैनिकांनी अलोट गर्दी केली होती.

## उद्धव ठाकरेंना लोकांची ॲलर्जी असल्यामुळेच लोक सोडून गेले - श्रीकांत शिंदे



**अहिल्यानगर** : उद्धव ठाकरे यांना लोकांची ॲलर्जी असल्यामुळेच आज त्यांच्यावर कुठल्यातरी मंगल कार्यालयात जाऊन सभा घेण्याची वेळ आली आहे. उद्धव ठाकरे हे आत्ता कुठे घराबाहेर पडले आहेत आणि बाहेर पडून लोकांना 'गद्दार-गद्दार' म्हणून हिणवत आहेत. मात्र, कालपर्यंत हेच लोक जेव्हा तुमच्यासोबत होते, तेव्हा ते चांगले होते आणि आता अचानक गद्दार कसे झाले? असा सवाल करत शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

श्रीकांत शिंदे म्हणाले की, 2019 मध्ये हिंदुत्वाच्या विचारांशी प्रतारणा करून उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसचे पाय धरले. त्यामुळे शिवसैनिकांचा आणि कार्यकर्त्यांचा त्यांच्यावरील विश्वास उडाला असून आजही हजारो कार्यकर्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश करत आहेत. तर खासदार आणि आमदार पक्षातून बाहेर पडल्यानंतर त्यांच्या मतदारसंघात जाऊन केवळ शिव्या देणे एवढेच तुम्हाला शिकवले आहे का? तुम्ही कधी आत्मपरीक्षण करणार आहात की नाही? असा सवाल ही शिंदेंनी केला आहे.

श्रीकांत शिंदे म्हणाले की, सामान्य जनता आणि लोकप्रतिनिधी आज मोठ्या संख्येने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जोडले जात आहेत; कारण लोकांच्या अडीअडचणीच्या काळात केवळ शिंदे त्यांच्यासाठी धावून जातात आणि उपयोगी पडतात. आज ठाकरे यांच्यावर जी परिस्थिती ओढावली आहे, त्याचे त्यांनी स्वतःच आत्मपरीक्षण करायला हवे.

श्रीकांत शिंदे म्हणाले की, माझा दौरा आधीपासूनच नियोजित आणि सुरू आहे. आतापर्यंत मी 62 विधानसभा मतदारसंघांचा दौरा पूर्ण केला आहे. पुढील आठवड्यात मी विदर्भ आणि कोकण दौऱ्यावर जाणार आहे. आमचा दौरा कोणाला शिव्या-शाप देण्यासाठी नसतो, तर तळागाळातील कार्यकर्त्यांना ताकद आणि बळ देण्यासाठी असतो, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

श्रीकांत शिंदे म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात सर्वच पक्षांचे लोक आहेत. विरोधक असले तरी शिंदे त्यांच्या मतदारसंघातील कामे करून देतात, हा सर्वांना विश्वास आहे. आम्ही सर्वांच्याच संपर्कात आहोत आणि म्हणूनच लोक शिवसेनेसोबत जोडले जात आहेत. पण जे कोणाच्याच संपर्कात नसतात, त्यांची काय अवस्था होते हे सर्वांना माहीतच आहे.

दरम्यान, खासदार ओमराजे निंबाळकर आणि श्रीकांत शिंदे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळणार असल्याच्या चर्चांवर त्यांनी सावध प्रतिक्रिया दिली. राजकारणातील अशा चर्चांना काही अर्थ नसतो, असे सांगत, "खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या शिवसेनेत येण्याने पक्षाची ताकद निश्चितच अधिक वाढली आहे.

## आधी तुमच्याच खात्यातली घाण साफ करा : आमदार अभिजीत पाटलांचा तुकाराम मुंढेंना सल्ला

**सोलापूर** : अन्न आणि औषध प्रशासन विभागाची धुरा हाती घेतल्यापासून धडाकेबाज कारवाया सत्र सुरू करणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे सध्या चर्चेत आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांवर त्यांनी कायद्याचा बडगा उगारल्याने जनतेतून त्यांचे कौतुक होत आहे. मात्र, याच वेळी माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी तुकाराम मुंढे यांना थेट आरसा दाखवत अन्न व औषध प्रशासन विभागात भ्रष्टाचार सुरू असल्याचे गंभीर आरोप केले आहेत. "मुंढेंनी बाहेर धाडी टाकण्यापेक्षा आधी स्वतःच्या खात्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांना बडतर्फ करून विभाग स्वच्छ करावा," असा सल्ला पाटील यांनी दिला आहे.

आमदार अभिजीत पाटील यांनी अन्न आणि औषध प्रशासन विभागातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांवर थेट भ्रष्टाचाराचे आणि गुटखा तस्करांना पाठीशी घालण्याचे गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले, "छत्रपती संभाजीनगरमध्ये कार्यरत असलेले प्रशांत कुचेकर आणि इलागे हे औषध प्रशासनातील दोन अधिकारी चक्क गुटख्याचे रॅकेट चालवतात. कुचेकर सोलापूरमध्ये असताना त्यांच्यावर गुटखा तस्करीचा गुन्हा दाखल झाला होता. तर अधिकारी इलागे यांच्या स्वतःच्या गाडीत तब्बल ३ कोटी ४२ लाखांची रोख रक्कम सापडली होती. हे अत्यंत गंभीर आहे."

आमदार पाटील यांनी संताप व्यक्त करत म्हटले की, "या दोन्ही अधिकाऱ्यांचा काळा कारभार मी स्वतः विधिमंडळ सभागृहात मांडला होता. सर्व पुरावे देऊनही सरकारने या दोघांवर केवळ 'शिस्तभंगाची' किरकोळ कारवाई केली, याचे मला दुःख वाटते. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना खात्यातून थेट बडतर्फ करण्याची गरज होती, तरच हा विभाग स्वच्छ होईल."

अन्न आणि औषध प्रशासन विभागाची यंत्रणा आतून कशी पोखरली गेली आहे, याचे दाखले देताना आमदार पाटील म्हणाले की, महाराष्ट्रात 'अशोक गुप्ता' नावाचा व्यक्ती गुटख्याचे मोठे रॅकेट चालवतो. मुंढे यांच्या विभागाचे पथक कुठेही धाड टाकण्यासाठी निघण्यापूर्वीच, विभागातील काही अंतर्गत अधिकारी या गुटखा तस्करांना फोन करून आधीच माहिती पुरवतात.

यामुळे कोट्यवधी रुपयांचा बेकायदेशीर माल केवळ लाखो रुपयांचा दाखवून उरलेला माल गायब केला जातो. हा सगळा प्रकार कसा चालतो, याची बित्तमबातमी आपण स्वतः तुकाराम मुंढे यांची भेट घेऊन त्यांच्या कानावर घातली असल्याचे पाटील यांनी सांगितले. मात्र, मुंढे यांच्या नावाच्या धास्तीमुळे बाजारात १०० रुपयांना १० मिळणाऱ्या गुटख्याच्या पुड्या आता १०० रुपयात ३ मिळतायत, असा टोलाही त्यांनी लगावला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २८ जून २०२६


# TET पेपरफुटीचा भिवंडीत उलगडा आणि लाखो स्वप्नांचा ऐनवेळी चक्काचूर!!

**म**हाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेला आणि परीक्षा पद्धतीला लागलेली 'पेपरफुटीची' कीड किती खोलवर रुजली आहे, याचा विदारक प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.२८ जून २०२६ रोजी राज्यभरातील १०२८ केंद्रांवर अत्यंत दिमाखात आयोजित केलेली शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अवघ्या काही तास आधी 'पुढे ढकलण्याची' अर्थात रद्द करण्याची नामुष्की महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेवर आली आहे.NEET २०२६ मधील महाघोटाळ्याचा धडा घेऊन सुरक्षेचे मोठे आव आणणाऱ्या यंत्रणेचे बुरुज भिवंडीत पहाटेच्या एका धाडीत ढासळले.गोपनीय माहितीच्या आधारे भिवंडी पोलिसांनी काही इसमांकडे घातलेल्या धाडीत थेट TET परीक्षेचे मूळ प्रश्नच जसेच्या तसे सापडले आणि प्रामाणिक कष्टाने रात्र रात्र जागणारा महाराष्ट्रातील तरुण पुन्हा एकदा उघड्यावर पडला.हा केवळ एका परीक्षेचा पेपर फुटलेला नाही,तर भावी शिक्षकांच्या निष्ठेचा,त्यांच्या माऊलींच्या डोळ्यांतील स्वप्नांचा आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या अब्रूचा लचका तोडला गेला आहे.यंत्रणेने परिपत्रकात मोठ्या अभिमानाने लिहिले आहे की, 'NEET परीक्षेतील गैरप्रकार लक्षात घेऊन आम्ही सुरक्षेच्या सर्व उपाययोजना केल्या होत्या.' परंतु,या तथाकथित 'सुरक्षिततेच्या' दाव्यांची लक्तरे भिवंडीच्या एका काळोख्या खोलीत वेशीवर टांगली गेली.परीक्षा उद्यावर आलेली असताना,आदल्या दिवशी पहाटे प्रश्नपत्रिकांचा काळाबाजार उघड होतो,याचा अर्थ परीक्षा परिषदेच्या गुप्ततेच्या भिंतींना आतूनच भगदाड पडले आहे, हे स्पष्ट होते.ज्यांच्या खांद्यावर उद्याच्या पिढीला घडवण्याची जबाबदारी असणार आहेत्या 'शिक्षक' पदाची परीक्षाच जर भ्रष्टाचाराच्या दलदलीतून जन्माला येणार असेल,तर या राज्याच्या शैक्षणिक भविष्याचे काय? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. प्रत्येक वेळी 'सखोल चौकशीचे' आणि 'पारदर्शकतेचे' तुणतुणे वाजवून परीक्षा पुढे ढकलली जाते,पण या परीक्षांच्या बाजारात कोट्यवधींची उलाढाल करणारे मुख्य सुत्रधार कधी गजाआड होणार? ग्रामीण भागातून,अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून आलेला तरुण परीक्षेची फी भरण्यासाठी,प्रवासाच्या खर्चासाठी पै-पै गोळा करतो.एस.टी.स्टँडवर,रेल्वे स्टेशनवर रात्री काढत परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या तयारीत असतो.पण ऐनवेळी त्याच्या हातात पडते ते 'परीक्षा स्थगितीचे' परिपत्रक!प्रामाणिक अभ्यास करणाऱ्या पोराच्या नशिबी फक्त अगतिकता आणि निराशा वाढून ठेवायची आणि पैशाच्या थपड्या मारून पेपर खरेदी करणाऱ्या 'श्रीमंतांच्या लाडक्या घोड्यांना' राजाश्रय द्यायचा, हाच काय तो परीक्षा परिषदेचा अजेंडा उरला आहे का?पोलिसांच्या धाडीत प्रश्न हुबेहूब जुळतात,याचा थेट अर्थ असा की मुख्य लॉकरच्या चाव्या अजूनही भ्रष्टाचाऱ्यांच्याच हातात आहेत."गोरगरिबांच्या घामाचा थेंब न थेंब अभ्यासाच्या पुस्तकावर सांडत असताना,व्यवस्थेच्या एसी केबिनमध्ये बसून काही लुटारू मात्र विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा जुगार खेळत आहेत."MPSC पाठोपाठ आता TET परीक्षेची झालेली ही दुर्दशा महाराष्ट्राला शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे.पारदर्शकतेचा आव आणणारे डिजिटल तंत्रज्ञान आणि खाजगीकरणाचे वारे अखेर 'काळ्या बाजाराचे' महामार्ग ठरत आहेत.आयोगाने किंवा परीक्षा परिषदेने हे लक्षात ठेवावे की,वारंवार परीक्षा रद्द करून तुम्ही केवळ तारीख पुढे ढकलत नाही,तर एका तरुणाचे वय,उमेद आणि त्याचा व्यवस्थेवर असलेला उरलासुरला विश्वास संपवून टाकता. भिवंडीत नोंदवलेला गुन्हा हा केवळ एका पोलीस ठाण्यापुरता मर्यादित न राहता,या संपूर्ण परीक्षा यंत्रणेच्या नाकर्तेपणावर मारलेला तीव्र शेरा आहे.आता तरी या पेपरफुटीच्या टोळ्यांचे कंबरडे मणक्यापासून तोडले जाणार की पुन्हा एकदा 'पुढील तारखेची' घोषणा करून या महापापावर पांघरूण घातले जाणार? हाच आज महाराष्ट्रातील प्रत्येक बेरोजगार तरुण तिखट शब्दांत विचारत आहे.




**विजय म्हस्के पाटील**
**मो.न-९५९५४०११११**
**[छत्रपती संभाजीनगर शहर]**


## बकासुर

बकासुराला भूक
लागली खूप
जोरजोराने ओरडे
बसेना चूप

दहा हांडे
खाल्ला भात
पोळ्याच्या गंजीवर
मारला हात

रांजण भरून
पिला थंड मठ्ठा
जो तो म्हणे
वा रे पठ्ठा!

शंभर लाडू
केले फस्त
ढेकर देत
हसतो मस्त

तहाण लागताच
हट्टी बकासुर
पिऊन टाकतो
नदीचा पूर

एवढे खाऊन
म्हणतोय काय
एकादशीचा
उपवास हाय !




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ


# शून्यातून विश्व निर्माण करणारे प्राचार्य डॉ. राजेंद्र मस्के यांचा सायकल ते प्राचार्य असा प्रेरणादायी जीवनप्रवास...

**आ**युष्याच्या वाटेवर जेव्हा परिस्थिती विरोधात असते, तेव्हा दोनच मार्ग असतात एक तर परिस्थितीसमोर गुडघे टेकायचे किंवा त्या परिस्थितीला आपल्या संघर्षाच्या जोरावर नमवायचे. प्राचार्य डॉ. राजेंद्र विश्वंभरराव मस्के यांनी दुसरा मार्ग निवडला आणि आज ते केवळ एक प्राध्यापक, प्राचार्य नाहीत, तर हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एक चालते-बोलते प्रेरणादायी व्यक्तिमत्वच ठरले आहेत. आयुष्यात यश मिळवण्यासाठी मार्ग सुकर असावा लागतो असे नाही, तर तो मार्ग आपल्या जिद्दीने आणि कष्टाने बनवावा लागतो. आजच्या तरुणाईसाठी संघर्षाची एक जिवंत यशोगाथा म्हणजेच डॉ. राजेंद्र मस्के होत. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अंतरवाली बुद्रुक या छोट्याशा गावात १२ जून १९६६ रोजी एका शेतकरी कुटुंबात राजेंद्र मस्के यांचा जन्म झाला. १२ एकर शेती, पण निसर्गाची अनिश्चितता आणि गरिबीचा वारसा. वडिलांचे शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत. घरची परिस्थिती पाहता राजेंद्र यांच्या शिक्षणाचा प्रवास अत्यंत खडतर होता. चौथीपर्यंत आजोळी, ५ वी ते ७ वी साठी रोज ४ किलोमीटर पायपीट आणि ८ वी ते १० वी साठी पुन्हा ४ किलोमीटर पायी प्रवास. पायाला पडलेले फोड आणि डोळ्यांत असलेले शिक्षणाचे स्वप्न, अशा द्वंद्वातून त्यांनी जिद्दीचे बीज आणि संघर्षाचा अंकुर आयुष्यात फुलवला.दहावी उत्तीर्ण झाल्यावर जेव्हा वडिलांनी आर्थिक टंचाईमुळे शिक्षणास नकार दिला, तेव्हा राजेंद्र मस्के खचले नाहीत. त्यांनी आजोळी जाऊन शिक्षणाचा ध्यास धरला. जालना येथील जे. ई. एस. महाविद्यालयात प्रवेश घेतला. रोजचे १२ किलोमीटर म्हणजे ये-जा करण्याचे २४ किलोमीटर अंतर. १३५ रुपयांत घेतलेली ती जुनी सायकल त्यांची एकमेव सोबती होती. तो सायकल प्रवास आणि नियतीचा एक धडाच ठरला. एकदा त्यांची सायकल पंक्चर झाली आणि खिशात पंक्चर काढण्यासाठी पैसे नव्हते. आजूबाजूला मदतीला कोणी नव्हते, अशा वेळी त्यांनी ती सायकल खांद्यावर घेतली आणि भर उन्हात मैलोन्मैल चालत गाव गाठल्याचा प्रसंग त्यांनी एकदा चर्चा करताना सांगितला. त्या दिवशी त्यांना जाणवले की, आयुष्यात संकटे कितीही मोठी असली तरी थांबणे हा पर्याय नाही, तर चालत राहणे हाच खरा यशाचा मार्ग आहे.अध्यापन ते राष्ट्रसेवेचा वारसा सेवानिवृत्तीपर्यंत त्यांनी जपला. एम. ए. राज्यशास्त्र, एम. फिल आणि 'महाराष्ट्राच्या राजकारणातील जमातवादाचा प्रभाव : एक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पूर्ण करून १९९२ मध्ये त्यांनी प्राध्यापक म्हणून कारकीर्द सुरू केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रवासात त्यांनी उपप्राचार्य, शिस्तपालन समितीचे अध्यक्ष, वस्तीगृह समितीचे अध्यक्ष आणि शेवटी सप्टेंबर २०२५ मध्ये प्रभारी प्राचार्य म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.विशेष म्हणजे, १९९८ ते २०२२ या २४ वर्षांच्या दीर्घकाळात त्यांनी एन.सी.सी. अधिकारी म्हणून देशाला शिस्तबद्ध तरुण दिले. 'एकता आणि अनुशासन' हे केवळ ब्रीदवाक्य न ठेवता, त्यांनी ते आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले. देहरादून येथे झालेल्या एन.सी.सी. कॅडेट्सच्या स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करताना देशातून दुसरा क्रमांक मिळवून देणे, ही त्यांच्या कारकिर्दीतील सुवर्णगाथा आहे.प्राचार्य डॉ. मस्के आजच्या तरुणाईला बजावून सांगतात,"शासकीय नोकऱ्यांच्या मागे धावताना स्वतःची कौशल्ये विसरू नका. बेरोजगारी ही केवळ एक समस्या नसून ती संधीची कमतरता आहे. तंत्रज्ञान आणि व्यावसायिक शिक्षणाची कास धरा. तुमच्यातील जिद्द हीच तुमची सर्वात मोठी पदवी आहे. याद राखा, सायकलवरून प्रवास करणारा मुलगा जर महाविद्यालयाचा प्राचार्य होऊ शकतो, तर तुम्ही आकाश का गाठू शकत नाही ?" परिस्थितीवर मात करण्याची जिद्द हवी, कष्टाच्या घामात यशाची शुद्ध हवी! डिग्रीच्या कागदांपेक्षा, अनुभवाच्या अनुभवांना महत्त्व द्या; कारण काळ कितीही बदलला तरी, कष्टाला पर्याय नाही. यश हे रस्त्यावर पडलेले नसते, ते संघर्षाच्या खडतर वाटेवर शोधावे लागते. ज्याप्रमाणे डॉ. मस्के यांनी आपल्या आयुष्यातील संकटांना शिस्तबद्धतेने आणि संयमाने हाताळले, तसेच प्रत्येक युवकाने आपल्या आयुष्याचे शिल्पकार स्वतः बनावे.




**शब्दांकन : प्रा. डॉ. महेश मोटे**
संशोधन मार्गदर्शक तथा समन्वयक,
राज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर विभाग,
श्री माधवराव पाटील महाविद्यालय,
मुरूम.



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २८ जून २०२६


## ज्ञानेश्वर विद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** विवेकानंद शिक्षण संस्था संचलित ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयातील कै. पंढरीनाथ पाटील शिसोदे उर्फ भाऊ सभागृहात या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जयंतीचे औचित्य साधून विद्यालयात भव्य वक्तृत्व (भाषण) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यामध्ये आराध्या फत्तेलष्कर हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर प्रियंका साळुंके हिने द्वितीय आणि वनिता साळवे हिने तृतीय क्रमांक मिळवला. तसेच वेदश्री काकडे व रोशन कासोटे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्रतिमा पूजनाने सुरुवातकार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून करण्यात आली. सदर कार्यक्रम विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी मंचावर अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ शिक्षिका मंगला नाईकवाडे व प्रमुख पाहुणे विद्यालयाचे पर्यवेक्षक संभाजी तांगडे यांची सन्माननीय उपस्थिती होती. तसेच प्रमुख वक्ते म्हणून रामेश्वर कोठुळे व संतोष अधाने उपस्थित होते. मान्यवरांचे मार्गदर्शनस्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांशिवाय विद्यालयातील इतरही अनेक विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनपटावर आणि त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यावर आधारित अभ्यासपूर्ण भाषणे सादर केली. यानंतर प्रमुख वक्त्यांनी व मान्यवरांनी आपल्या भाषणातून शाहू महाराजांच्या विचारांची आजच्या काळातील गरज यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचा समारोप ज्येष्ठ शिक्षिका मंगल पवार यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाला.

सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन मंगला सुलताने यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉक्टर रवींद्र साठे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांचा सत्कार




**छत्रपती संभाजीनगर :** बिडकीन सर्कलचे छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा परिषद गटनेता तथा जि. प. सदस्य मा. मनोजभाऊ पेरे यांच्या हस्ते नुकतेच बिडकीन येथे प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर ता. पैठण यांचा शाल, पुष्पहार देऊन श्री. अय्युब पठाण यांचा यथोचित सत्कार करण्यात आला आहे. लेखक अय्युब पठाण यांचा बालभारतीच्या इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाला संपूर्ण महाराष्ट्राच्या शाळेमध्ये "कौतुकाची थाप" या पाठाचा अभ्यासक्रमात समावेश झाल्याने छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा परीषद गटनेता पदी असलेले मा. मनोजभाऊ पेरे यांनी अय्युब पठाण यांचा भव्य सत्कार करून लेखक पठाण यांच्या पाठीवर आशिर्वादरूपी कौतुकाची थाप देऊन त्यांना पुढील साहित्य लेखनास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बिडकीन ग्राम पंचायतीचे माजी सदस्य फेरोजभाई सय्यद यांनी सुध्दा अय्युब पठाणचा पुष्पहार देऊन सत्कार केला आहे.

यावेळी जफरखान पठाण, शुभम केंद्रे, मुदस्सर पठाण समीर शेख, मोईन पठाण आणि परिसरातील गावककरी हे मोठ्या संख्येने सत्काराच्या कार्यक्रमाला हजर होते. शेवटी सर्वांनी चहापाणी घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## पहिल्याच दमदार पाऊसाने आडगाव बाजार ते आडगाव फाटा रस्त्यावरील वळण रस्ते गेले वाहून



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील आडगाव बाजार आज पर्यंतच्या दमदार झालेल्या पहिल्याच पावसात आडगाव परिसरातील सर्व ओढ्याना पूर आल्याने आडगाव बाजार ते आडगाव फाटा रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली. आडगाव फाटा ते धार फाटा रस्त्यावरील पुलांचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे.पुलांच्या बाजूने काढून दिलेले वळण रस्ते हे पहिल्याच पावसाच्या पुराणे वाहून गेल्याने आडगाव बाजार ते आडगाव बाजार वाहतील पूर्ण ठप्प झाली.आडगाव बाजार ते आडगाव फाटा रस्त्यावर मोठ मोठे तीन पूल आहेत आणि त्या पुलांचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याचे सर्व पुलांच्या बाजूने काढून दिलेले वळण रस्ते वाहून गेल्याने परिसरातील ये जा करणारे नागरिक तीन पुलांच्या मध्ये अडकून पडले आहेत .अडकून बसलेल्या नागरिकांना पूर परिस्थिती आटोक्यात आल्यावर बाहेर पडावे लागणार आहे. लवकरात लवकर आडगाव फाटा ते आडगाव रस्त्यावरील पूल बांधून पूर्ण करण्यासाठी मागणी नागरिक करीत आहेत.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com



**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २८ जून २०२६


# मराठा आरक्षणाची पुढील सुनावणी १० जुलै रोजी होणार!

**मुंबई (प्रतिनिधी)** २४ जून २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालय मध्ये मराठा एस इ बी सी आरक्षणा विरोधात असलेल्या याचिकावर सर्वोच्च न्यायालयाने नियुक्ती केलेले विशेष न्यायापीठ ज्या मध्ये प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही.घुगे, न्यायमूर्ती एन. जे. जमादार आणि न्यायमूर्ती संदीप व्ही. मारणे यांचा समावेश आहे.या न्यायपीठा समोर २४ जून २०२६ रोजी झालेल्या सुनावणी नंतर दिलेल्या न्यायालयीन आदेशात म्हंटले आहे की,प्रतिवादी असलेल्या राज्याच्या वतीने जेष्ठ महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठ्ये यांनी ३.०० ते ५.००या दुपारच्या वेळेत आपला तोंडी युक्ति वाद सुरू ठेवला. त्यांनी राज्याच्या वतीने 'नोट -४ बी म्हणजे टीप -४बी सादर केली या शीर्षकाखालील मुद्दा क्र. ३ बाबतचा आपला युक्तिवाद सादर केला आहे. डॉ.मिलिंद साठ्ये यांनी न्यायालयास कळवले आहे की त्यांना त्यांचे राज्य शासनाच्या वतीने असलेले म्हणणे मांडण्यासाठी आणखी दोन सत्रांची आवश्यकता आहे असे जेष्ठ वकील नानकानी आणि वकील विजय थोरात यांनी नमूद केले की, त्यानंतर त्यांनाही एका सत्राची आवश्यकता असेल.न्यायालयाने पक्षकारांची सोय विचारात घेऊन, ही प्रकरणे १० जुलै २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणीसाठी ठेवण्याचे आदेश दिले असुन या मुळे जेष्ठ महाधिवक्ता डॉ.मिलिंद साठ्ये दुसऱ्या सत्रात आपला तोंडी युक्तिवाद पुढे चालू ठेवू शकतील असे आदेश प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रविंद्र घुले,न्यायमूर्ती एन. जे. जमादार आणि न्यायमूर्ती संदीप व्ही. मारणे मारणे यांनी दिले आहेत.या प्रकारणांतील विविध याचिका कर्त्यांच्या वतीने वकील निहार चित्रे, आणि या प्रकारणात प्रतिवादी असलेल्या राज्याच्या वतीने महा धिवक्ता वकील मिलिंद साठ्ये यांच्यासोबत सरकारी वकील नेहा भिडे, अतिरिक्त सरकारी वकील पी. पी. काकडे, 'बी' पॅनेल वकील जय संकलेचा आणि अतिरिक्त सरकारी वकील जी.आर.रघुवंशी जनहित याचीका मध्ये प्रतिवादी असलेल्या राज्याच्या वतीने ज्येष्ठ व विशेष वकील व्ही. ए. थोरात यांच्या सोबत सरकारी वकील नेहा भिडे, अतिरिक्त सरकारी वकील ओ.ए.चांदुरकर, अतिरिक्त सरकारी वकील प्राची तटके आणि अतिरिक्त सरकारी वकील प्रियांका चव्हाण,विभोर हरिष लाद्दाड यांचे जनहीत याचिका मध्ये प्रतिवादी असलेल्या राज्याच्या वतीने महाधिवक्ता वकील मिलिंद साठ्ये यांच्यासोबत 'बी' पॅनेल वकील जय संकलेचा आणि अतिरिक्त सरकारी वकील मोहित जाधव आदी कामकाज पाहत आहेत. वरील सर्व प्रकरणां मध्ये मराठा समाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचीका कर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे वतीने विधीज्ञ श्रेयश देशपांडे, मधुर अनिल गोलेगावकर आदी कामकाज पाहत आहेत. विशेष म्हणजे या सुनावणी साठी मोजके काही लोकच उपस्थित असतात त्यात प्रामुख्याने अनवानी असलेले आणि मराठा आरक्षण मिळणार नाही तो पर्यंत पायात चप्पल बूट घालणार नाही असे प्रण केलेले मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील, प्रा अंबादास मोहीते, प्राचार्य तांबे, रामचंद्र शेडगे, संतोष दळवी, सुभाष देसाई, प्रशांत भोसले आदी मराठा क्रांती मोर्चाचे लोक उपस्थित असतात हे विशेष होय.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेनिमित्त कंटेकुर येथे जनजागृती प्रभात फेरी



**मुरूम :** कंटेकुर, ता. उमरगा येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कंटेकुर यांच्या वतीने गावात जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभातफेरीत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ तसेच स्थानिक मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रभातफेरीची सुरुवात शाळेपासून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी "प्रत्येक बालकाला दोन थेंब—पोलिओला कायमचा अंत", "पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करूया", "दोन थेंब जीवनाचे, प्रत्येक बालकासाठी सुरक्षिततेचे" अशा विविध घोषणांद्वारे गावकऱ्यांमध्ये पोलिओ लसीकरणाबाबत जनजागृती केली. प्रभातफेरी गावातील प्रमुख रस्त्यांवरून काढण्यात आली. यावेळी लक्ष्मीकांत पटणे यांनी गावातील नागरिकांना २८ जून २०२६ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण दिनाची माहिती दिली. तसेच ग्रामीण भागात २९ जून ते २ जुलै २०२६ दरम्यान आणि त्यानंतर ४ जुलै २०२६ रोजी घरोघरी जाऊन बालकांना पोलिओ डोस पाजण्यात येणार असल्याचे सांगितले. पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब पाजणे अत्यंत आवश्यक असून कोणतेही बालक या मोहिमेपासून वंचित राहू नये, असे आवाहन करण्यात आले.प्रभातफेरीनंतर उपस्थित ग्रामस्थांना पोलिओ लसीकरणाचे महत्त्व, पोलिओ रोगाचे दुष्परिणाम आणि लसीकरणामुळे मिळणारे संरक्षण याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. गावातील नागरिकांनीही या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देत सर्व पालकांनी आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्याचे आवाहन केले. या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक नागेंद्र समन, लक्ष्मण येवते, लतिफ लदाफ, जीवन सूर्यवंशी, विजयकुमार कलशेट्टी, चित्ररेखा दंडे, तनुजा गाढवे व लक्ष्मीबाई शिकारे, ग्रामपंचायत सदस्य, आशा व अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कंटेकुर यांच्या वतीने करण्यात आले.

# प्रतिभा निकेतन विद्यालय मुरूम शैक्षणिक साहित्य वाटप



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** प्रतिभा निकेतन विद्यालय मुरूम येथे श्री बसवेश्वर हायस्कूल जेवळी वर्गमित्र १९८५ ट्रस्ट जेवळी ता. लोहारा यांच्यातर्फे इयत्ता पाचवीच्या १३० मुलांना शैक्षणिक साहित्य (वही) वाटप करण्यात आले वर्ग मित्र १९८५ ट्रस्ट २०१८ पासून श्री बसवेश्वर हायस्कूल जेवळी, जि.प.शाळा दक्षिण जेवळी, जि.प.शाळा रुद्रवाडी जि प शाळा फनेपूर जि. प. शाळा विलासपूर पांढरी जि. प. शाळा वडगाव,जि. प. शाळा वडगाव वाडी जि. प. शाळा सय्यद हिप्परगा,जि.प. शाळा सालेगाव आदी शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप केलेले आहेत प्रत्येक वर्षी जिल्हा परिषद आणि संस्थेतल्या शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप करतात यावर्षी प्रतिभा निकेतन विद्यालय मुरूम येथे वर्ग मित्र १९८५ तर्फे पाचवीच्या मुलांना वही वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य घुरघुरे सर,प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य कोंढारे सर, पर्यवेक्षक परसाळगे सर, एस बी एच एस वर्ग मित्र १९८५ ट्रस्टचे अध्यक्ष शिवशरण तांबडेसर, उपाध्यक्ष वैजनाथ पाटील, संचालक संजय राजपूत, नूतन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजशेखर कोरे, पंडित कारले पांडुरंग वाकडे लोहारा पंचायत समितीचे माजी उपसभापती व्यंकट कोरे,र वी स्वामी सर, कोराळेसर,संतोष बिंदगे सर,पाटील सर, चव्हाण सर, कंटेकुरे मॅडम, सपाटे मॅडम, स्वामी मॅडम, कोराळे मॅडम, कु. अनिशा फुगटे उपस्थितांचे आभार मानून वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २८ जून २०२६

## बापाचे अस्तित्व

बापाचे दु:ख कोणाला कधीच समजत नाही.
दु:खात बाप अश्रू कधीच ढाळणार नाही.

संकटांशी लढताना बाप ठाम उभा राहतो.
संकट ही बापाचे काही बिघडू शकत नाही.

बाप असतो लढवय्या नित्य संकटांशी लढणारा.
संकटांना घाबरून बाप कधीच पळणार नाही.

संकटांशी लढण्यासाठी बाप सज्ज असतो.
संकटात साथ कुणाची बाप सोडणार नाही.

संकटकाळात सर्वांच्या बाप सोबत असतो.
संकटांशी लढताना बाप थकणार नाही.

संकटांनाच बाप जगण्याची ऊर्जा बनवतो.
संकटांशी लढताना बाप मागे हटणार नाही.

बापाचे अस्तित्व सदा बाप गेल्यावरच कळते.
सतत लढणारा बाप कोणाला कळणार नाही.

कुटुंबाच्या भल्यासाठी राब राब राबत असतो.
स्वत:च्या सुखासाठी बाप कधीच जगत नाही.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

# मुरूम शहरातील नागरिकांच्या वतीने लोकराजे राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** सामाजिक समतेचे अग्रदूत, बहुजन समाजाचे उद्धारकर्ते आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मुरूमकरांच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी शाहू महाराजांच्या सामाजिक न्याय, शिक्षण प्रसार, समता आणि बंधुतेच्या विचारांचे स्मरण करत त्यांच्या कार्याचा गौरव केला.याप्रसंगी वक्त्यांनी सांगितले की, राजर्षी शाहू महाराज यांची जयंती केवळ उत्सव म्हणून न साजरी करता त्यांच्या विचारांचे आत्मपरीक्षण करणे आणि आजच्या सामाजिक परिस्थितीत त्यांच्या तत्त्वांची प्रासंगिकता समजून घेणे ही काळाची गरज आहे. महाराजांचे नाव घेणे, त्यांच्या नावाने संस्था, रस्ते किंवा चौक उभारणे यापेक्षा त्यांनी अपेक्षित केलेला समताधिष्ठित समाज घडविण्यासाठी त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि त्यासाठी कार्य करणे अधिक महत्त्वाचे आहे.आज काही समाजकंटकांकडून महापुरुषांच्या नावाचा वापर करून समाजात तणाव निर्माण करण्याचे प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. अशा प्रवृत्ती ओळखून त्यांना वेळीच रोखणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. लोकराजे शाहू महाराजांचा इतिहास समाजात ऐक्य, समता आणि सामाजिक सलोखा निर्माण करण्याची प्रेरणा देतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.जात-पात, भेदभाव आणि सामाजिक कटुता दूर करून प्रत्येकाला न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच सामाजिक ऐक्यासाठी खंबीरपणे उभे राहणे हीच शाहू महाराजांना खरी आदरांजली ठरेल, असेही यावेळी सांगण्यात आले.क्रांतीसूर्य लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरवासीयांच्या वतीने त्यांच्या विचारांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी भगत माळी,मोहन जाधव व राजू गायकवाड यांनी शाहू महाराजांच्या कार्यावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास युवासेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख प्रल्हाद (भगत) माळी, इतिहास अभ्यासक मोहन जाधव, राजेंद्र गायकवाड, दादा बिराजदार, दिपक मुळे, संतोष जाधव , राजेंद्र घोडके, पंकज कांबळे, अमोल भालेराव, लालसिंग भोसले, दुर्गे मामा, देवानंद शिंदे, वैजीनाथ करगले, इराय्य स्वामी, अनिल चव्हाण तसेच सामाजिक कार्यकर्ते सिध्दलिंग अप्पा हिरेमठ उपस्थित होते.

# अतिदुर्गम भागातील आदिवासी ठाकर समाजाला आजही रेशनचे धान्य मिळवण्यासाठी २ किलोमीटर करावी लागते पायपीट





**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील आदिवासी (निरगुडी बु) ठाकरवाडी ही ब्रह्मगिरी पर्वतरांगांमध्ये, निसर्गरम्य महेशमाळ (म्हैसमाळ) या हिरव्यागार डोंगराच्या पायथ्याशी वसलेली एक छोटीशी आदिवासी वस्ती आहे. या ठाकरवाडीत सुमारे 90 टक्के आदिवासी ठाकर समाज वास्तव्यास आहे. सुंदर निसर्गसंपदा लाभूनही या गावाला आजही मूलभूत सुविधांची कमतरता भासत आहे. गावातील नागरिकांना रेशनचे धान्य आणण्यासाठी तब्बल दोन किलोमीटर पायपीट करावी लागते. पायपीट थांबवण्यासाठी ठाकर वाडीत दुय्यम रेशन धान्य दुकान सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे. ठाकरवाडीतील नागरिक पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा ,रस्ते, अंगणवाडी, यांसारख्या अनेक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे ग्रामस्थांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या या आदिवासी ठाकरवाडीच्या सर्वांगीण विकासासाठी शासन आणि समाजाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २८ जून २०२६

## राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांना सामाजिक कार्यासाठी मानद डॉक्टरेट प्रदान



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** समाजातील वंचित, दुर्बल, शेतकरी, मेंढपाळ, भटक्या-विमुक्त, ओबीसी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक दशकांपासून सातत्याने केलेल्या नि:स्वार्थ सामाजिक कार्याची दखल घेत राज्यसभा खासदार रामराव सखाराम वडकुते यांना Bharath Virtual University for Peace and Education यांच्या वतीने "Honorary Doctorate in Social Service" (मानद डॉक्टरेट – सामाजिक सेवा) हा प्रतिष्ठेचा सन्मान बेंगळुरू येथे आयोजित विशेष दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात आला.मा. रामराव वडकुते यांचे सार्वजनिक जीवन हे समाजसेवा, लोककल्याण आणि विकासाभिमुख नेतृत्वासाठी ओळखले जाते. ग्रामीण भागातील शेतकरी, पशुपालक, धनगर समाज, ओबीसी, महिला, युवक आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष करून शासनाच्या विविध स्तरांवर प्रभावी पाठपुरावा केला आहे. सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार, पाणी, सिंचन, ग्रामीण विकास आणि वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा राष्ट्रीय सन्मान बहाल करण्यात आला.मा. वडकुते यांनी महाराष्ट्र राज्य शेळी व मेंढी विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून पशुपालक आणि मेंढपाळ समाजाच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबविले. त्यानंतर महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार म्हणून त्यांनी शेतकरी, धनगर समाज, ओबीसी, शिक्षण, सिंचन, पाणीटंचाई, ग्रामीण विकास, सामाजिक न्याय आणि रोजगाराशी संबंधित अनेक महत्त्वाचे प्रश्न विधान परिषदेत प्रभावीपणे मांडले. सध्या ते राज्यसभेचे खासदार म्हणून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत असून जनहिताच्या विषयांवर सक्रियपणे कार्यरत आहेत.Bharath Virtual University for Peace and Education ही संस्था शांतता, शिक्षण, मानवतावादी मूल्ये, सामाजिक विकास आणि सार्वजनिक जीवनातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी मानद डॉक्टरेटसह विविध राष्ट्रीय सन्मान प्रदान करत असल्याचे संस्थेकडून नमूद करण्यात आले आहे. यापूर्वीही सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, उद्योग, सार्वजनिक जीवन आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांना या संस्थेने मानद डॉक्टरेट प्रदान केली आहे.बेंगळुरू येथे झालेल्या या समारंभात देशातील विविध राज्यांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रसंगी मा. रामराव वडकुते यांचा विशेष सत्कार करण्यात आला.या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना मा. रामराव वडकुते म्हणाले, "हा सन्मान माझा नसून समाजासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. या गौरवामुळे समाजाप्रती माझी जबाबदारी अधिक वाढली असून, भविष्यातही जनसेवा, सामाजिक न्याय आणि राष्ट्रहितासाठी अधिक जोमाने कार्य करत राहीन."या सन्मानाबद्दल महाराष्ट्रासह विशेषत: मराठवाड्यातील विविध सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मा. रामराव साहेबराव वडकुते यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## पत्नीची लोखंडी रॉड मारून हत्या



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** जिंतूर तालुक्यातील धानोरा देवगाव येथे गुरुवारी (दि. २५ जून) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास पतीने पत्नीच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत मीरा गजानन कुटे यांचा मृत्यू झाला असून आरोपी पती गजानन कुटे हा फरार झाला आहे.

जिंतूर तालुक्यातील धानोरा देवगाव येथील मीरा कुटे या त्यांच्या राहत्या घरी असताना पती गजानन कुटे घरी आला. दारू पिण्यासाठी पैसे दे अथवा गळ्यातील सोन्याची पोत दे, अशी मागणी त्याने केली. मात्र मीरा कुटे यांनी त्यास नकार दिल्याने दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन संतापाच्या भरात गजानन कुटे याने हातातील लोखंडी रॉडने मीरा कुटे यांच्या डोक्यावर वार केले. यात त्या गंभीर जखमी झाल्या.घटनेची माहिती शेजाऱ्यांना मिळताच त्यांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली.

ही घटना घडल्यानंतर आरोपी गजानन कुटे हा घटनास्थळावरून पसार झाला. गावकऱ्यांनी ॲम्ब्युलन्सच्या मदतीने मीरा कुटे यांना बोरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.घटनेची माहिती मिळताच बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा व तपासाची प्रक्रिया सुरू केली.दरम्यान, घटनेची माहिती मयत महिलेच्या माहेरच्या नातेवाईकांना मिळताच त्यांनी बोरी ग्रामीण रुग्णालयात मोठी गर्दी केली.

आरोपी पती गजानन कुटे तसेच सासरच्या संबंधित व्यक्तींना अटक झाल्याशिवाय शवविच्छेदन करू देणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे, पीएसआय थोरवे, पोलीस कर्मचारी शेख वसीम, राजेश जटाळ, प्रताप साळवणे, विशाल लाड, पोलीस शिपाई दिशान सय्यद, होमगार्ड डी.ए. कुटे, उमर पठाण, विशाल अंभुरे, नागेश खैरे यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त बोरी ग्रामीण रुग्णालय तसेच धानोरा देवगाव येथे तैनात करण्यात आला होता.या प्रकरणी बोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून फरार आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. पुढील तपास बोरी पोलीस करीत आहेत.

## जिंतूर भूमी अभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांकडून वकील विरोधात तहसीलदारांकडे लेखी तक्रार



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, जिंतूर येथे दिनांक १८/०६/२०२६ रोजी एका वकिलाने कार्यालयीन कामकाजात अडथळा आणून कर्मचाऱ्यांसोबत अरेरावी केल्याची घटना घडली आहे। याप्रकरणी कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे तहसीलदार जिंतूर व पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे।जिंतूर तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की दुपारी ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान एका पक्षकाराच्या अर्जाची पोहच मिळण्यासाठी ॲड.मनोज कन्हैयाल सारडा हे उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात आले होते। कार्यालयाच्या नियमानुसार त्यांना अर्जाची पोहच देण्यात आली.मात्र, पोहच मिळाल्यानंतर सदर वकिलांनी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा व संपूर्ण कार्यालयाचा मोबाईलवर व्हिडिओ शूटिंग केली त्यानंतर ११२ क्रमांकावर फोन करून पोलिसांना पाचारण केले व कार्यालयात गोंधळ घातल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे तसेच, कर्मचाऱ्यांवर मद्यपान करून कार्यालयात आल्याचा खोटा आरोप केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकारामुळे कार्यालयीन कामकाजात व्यत्यय आला असून कर्मचाऱ्यांची बदनामी झाल्याचे निवेदनात म्हटले आहे कर्मचाऱ्यांनी या अयोग्य वर्तनाबत व बदनामी करणाऱ्या मजकुराबत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी तहसीलदारांकडे केली आहे कार्यालयीन अधीक्षक यांच्याशी बोलताना अपमानास्पद भाषा वापरून कार्यालयाचा शिस्त भंग करून शासकीय कामात अडथळा करत कार्यालयाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी सदर कार्यालयाचे कार्यालयीन कर्मचारी यांच्या विषयी वृत्तपत्रात बदनामी कारक मजकूर प्रसिद्ध केला आहे असे हे वर्तन व्यावहारिक आचार संहितेला धरून नाही त्यामुळे कार्यालयीन कर्मचाऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे अशा या कृत्यामुळे कार्यालयीन सर्व कर्मचारी यांच्या जीवाला काही धोका झाल्यास व तसेच कार्यालयात काही प्रश्न उद्भवल्यास त्यास ॲड. मनोज कन्हैयाल सारडा हे जबाबदार राहतील असे निवेदनात म्हटले आहे सदर अधिवक्त्याचे अशोभनीय वर्तन, शिवीगाळ आणि वर्तमानपत्रात बदनामी करून मजकूर प्रसिद्ध केल्यामुळे योग्य कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली असून निवेदनावर ई. के. फुपाटे (मु.स.), अभय कुलकर्णी (शिरस्तेदार),आर. के. भराडे (प.भू ),एम. एच. म्हेत्रे (प.भु.), पी. टी. भाकड(निमतानदार)बी. बी. पाटील (छा.लि.) के. पी. खके (अ.पा.ल.)पी. एम. जगताप (भू कर मापक) आर. एम. गवळे (भू मापक)एस. बी. चौधरी (क.लि.) व्हि. बी. बाहेकर (भू कर मापक) एस. पी. सोनार (दु.लि) श्री एम. यु. वानखेडे (न.भु.लि.) एस. के. सोमणी (भू मापक) व्हि. एम. चव्हाण (शिपाई) ओ. एम. लाटे (शिपाई )श्रीमती पी. एम. कदम (शिपाई) आदींचे स्वाक्षरी आहेत



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २८ जून २०२६

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय

शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती. या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.कर्जमुक्ती योजना काय आहे :- *२०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.एकवेळ समझोता योजना (One Time Settlement):1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2026 अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह 30 सप्टेंबर 2025 अखेर थकीत असलेली आणि 31 मार्च 2026 पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.प्रोत्साहनपर लाभ : नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत 2022-23, 2023-24 आणि 2024-25 पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन 30 जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. 50 हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी 2025-26 व 2026-27 या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा:महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु. ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (OTS) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.योजनेचे निकष :• पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी 2 लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.• 1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2025 या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.• 30 सप्टेंबर 2025 अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.• 31 मार्च 2026 पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.• जमीन धारणेची अट नाही.• पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही 2 लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.• 2 लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम 31 मार्च 2027 पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.• शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.• राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जांना लागू.कोण पात्र असणार नाहीत : ● विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.● केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु. २५ हजार पेक्षा अधिक आहे.● राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.● शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती● निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिक ● मासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).● कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. 25 हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.



**भगवंत पाळवदे,**
**अंबाजोगाई, बीड**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002